ओडीशा शासनाला राज्य शासनाकडून
रुपये १० कोटी मदत देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक-एससीवाय-०६/२०१९/प्र.क्र.२८/म-११,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक:- ६ मे, २०१९.

<u>वाचा</u> :-महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. पुनर्वि-२०१९/२२४५/प्र.क्र.८४/ब-१, दि.६/५/२०१९.

प्रस्तावना :-

ओडीशा राज्यात मे, २०१९ मध्ये फोनी चक्रीवादळामुळे मोठया प्रमाणात नैसर्गिक आपत्ती उद्भवली असून त्यामुळे मोठया प्रमाणात जीवित व वित्त हानी झालेली आहे. फोनी चक्रीवादळामुळे ओडीशा राज्यातील जनजीवन व दळणवळण इत्यादी बाबी प्रभावित होऊन जनजीवन विस्कळीत झाले असून या नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून ओडीशा शासनास मदत म्हणून रुपये १० कोटी (रु. दहा कोटी) इतका निधी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

ओडीशा राज्यात मे, २०१९ मध्ये फोनी चक्रीवादळामुळे राज्यात उद्भवलेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधी, ओडीशा यांना रुपये १० कोटी (रु. दहा कोटी) इतका निधी मदत म्हणून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. या प्रयोजनासाठी आवश्यक असलेला निधी मागणी क्रमांक सी-६,२२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ८०, सर्वसाधारण ८००, इतर खर्च, ९४ आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य (९४) (०१) इतर राज्यांना आपत्ती निवारण मदतीसाठी सहाय्य (अनिवार्य), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२४५ २५४१) या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या चालू वित्तीय वर्षामध्ये लेखाशीर्ष क्रमांक (२२४५ २४५२) या लेखाशीर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतूदीतून पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

३. सदर निधी आहरीत करण्यासाठी “श्रीमती वनिता बाविस्कर, लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच श्रीमती राजश्री राऊत, वित्तीय सल्लागार व सह सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. लेखाधिकारी, यांनी सदर रक्कम Odisha Chief Minister’s Relief Fund,

Account No—11109339165
IFSC Code- SBIN0010236
State Bank of India, Secretariat Branch
Bhubaneswar या खात्यामध्ये हस्तांतरीत करावी.

५. सदर शासननिर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचे अनौपचारीक संदर्भ क्र. १७५/२०१९/व्यय-९, दिनांक ६/५/२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१९०५०७१२४२००७६१९** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJASHREE MILIND RAUT

Digitally signed by RAJASHREE MILIND RAUT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=58e3cf7b9657c2ed6d6d47f01918bccb8dcaac1f1b6f31c7c723db4deb16f5f2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=6689500497ea8c2084eb7b303b8b2f3922ec7b73b6347d04e043dc0b8ef0fd64, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJASHREE MILIND RAUT
Date: 2019.05.07 12:54:42 +05'30'

(राजश्री राऊत)
वित्तीय सल्लागार व सह सचिव

प्रति,

१. संचालक, मुख्यमंत्री सहायता निधी, ओडीशा राज्य.
२. महालेखापाल-१/२(लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षण), महाराष्ट्र राज्य,मुंबई / नागपूर.
३. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ०२३,
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखाधिकारी, मुंबई.
६. लेखाधिकारी, आव्यप्र-६,(मदत व पुनर्वसन) मंत्रालय, मुंबई.(दोन प्रती)
७. वित्त विभाग (अर्थसंकल्प-६/व्यय-९), मंत्रालय,मुंबई
८. उपसचिव, का.म-७
९. कार्यासन अधिकारी (ब-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०.निवडनस्ती (म-११)

<u>प्रत माहितीसाठी अग्रेषित</u> :-

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. मा. सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई.